# गोपाळशास्त्री

वासू देशपांडे

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. 3ee दिनांक ......
विषय बा.वा.

BVBK-0-00399

मूल्य एक रुपया

प्रकाशक
श्याम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य
१२५७ सदाशिव पेठ, पुणे ३०

प्रथम मुद्रण
१८ जानेवारी १९७५
कै. नाथ पै स्मृतिदिन

© प्रशान्त देशपांडे, पुणे

मुद्रक
नाना डेंगळे
साधना प्रेस,
४३०-३१ शनिवार, पुणे ३०

# १

फार वर्षांपूर्वीची गोष्ट. एक महागाव नावाचे शहर होते. सर्व विद्या–कलांचे ते माहेरघर म्हणून ओळखले जाई. साऱ्या भारतवर्षातून विद्यार्थी ज्ञानार्जनासाठी तेथे येत.

अशा या गावात गोविंदशास्त्री नावाचे एक वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण राहात असत. महागावातील एक विद्वान ब्राह्मण म्हणून त्यांची प्रसिद्धी होती. त्यांचे स्वतःचे घर म्हणजे गुरुकुल होते. अनेक शास्त्रांचा अभ्यास ते स्वतः करून घेत असत. राजे–रजवाडे, मोठेमोठे सरदार आपली मुले या गोविंदशास्त्र्यांच्या गुरुकुलात ठेवीत. त्यांना राजदरबारी पण तशीच मान-मान्यता होती. चौदा विद्या, चौसष्ट कलांचे शिक्षण ते देत असल्यामुळे मुले त्यांच्याकडे शिकण्यास नेहमी उत्सुक असत. पण ते कडक शिस्तीचे कडवे भोक्ते होते. कामचुकारपणा त्यांना मुळीच आवडत नसे. ते स्वतः खूप परिश्रम करीत आणि इतर विद्यार्थ्यांनीही परिश्रम करावेत- अशी त्यांची अपेक्षा होती. पहाटे कोंबडा आरवल्या-पासून विश्रान्ती न घेता रात्रौ खूप उशीरपर्यंत जागून ते काम पूर्ण करूनच झोपत असत. वरवर ते हेकट वाटत. क्रोधाच्या बाबतीत मात्र ते जमदग्नीचे अवतारच. कोणाचे त्यांच्यासमोर चालत नसे. ते शीघ्रकोपी होते.

अशा या गोविंदशास्त्र्यांची पत्नी सौ. रमाबाई ह्या अतिशय सालस होत्या. त्या नेहमी नवऱ्याच्या अर्ध्या वचनात असत. गुरुकुल चालत असल्यामुळे इतक्या मुलांचे काम त्यांना करावे लागे; अगर त्यांच्याकडून करवून घ्यावे लागे. भांड्याला भांडे लागले म्हणजे आवाज होणारच, हे त्या जाणून होत्या. चुकूनसुद्धा त्यांचा आवाज कधी मोठा होत नसे. त्या मुलांना आईच्या ठिकाणी होत्या. गुरुकुलात शिकणाऱ्या मुलांना या

साध्वी स्त्रीबद्दल अतिशय प्रेम व जिव्हाळा वाटे. ते नेहमी रमाबाईंना रमाकाकू म्हणत. रमाकाकू म्हणजे या सर्व मुलांचे दैवत होऊन बसल्या होत्या. या मुलांच्या आजारीपणात त्या स्वतः जातीने मुलांची सेवा करीत, गोड गाणी म्हणत, मुलांना गोष्टी सांगत. मुले शास्त्र्यांच्याकडून वेद शिकत परंतु रमाकाकूंच्याकडून ते इतर अनेक गोष्टी शिकत. फुलांवर, जीवजंतूंवर ते प्रेम करायला काकूंच्याकडे शिकत. त्या मुलांना जीव लावत. मुले अभ्यास संपवून अक्षरशः अश्रूंनी त्यांचे पाय भिजवून सोडीत. इतकी माया त्यांनी मुलांना लावली होती.

त्यांना गोपाळ नावाचा एकुलता एक मुलगा होता. लहानपणापासून वडिलांपेक्षा त्याला आईचा लळा अधिक लागला होता. वडिलांबद्दल अगदी लहानपणापासून एक विचित्र अढी त्यांच्या मनात वसली होती. क्रोधी पिता त्याला आवडत नसे. त्यांच्यासमोर उभे राहण्यास तो भीत असे. बालपणापासून अशी दहशत त्याने आपल्या पित्याची घेतली होती. त्यामुळे आपल्या पित्याबद्दल त्याला फारसे प्रेम वाटत नसे. लहानसहान चुकांबद्दल त्याला कठोर शिक्षा मिळे. कधी चार तास एका पायावर उभे रहा, कधी अंगठे धरून रहा, अशा प्रकारच्या शिक्षा त्याला मिळत. एकदा अन्नाला नावे ठेवल्यामुळे भरल्या पानावरून त्याला उठावे लागले होते. गोविंदशास्त्री शिक्षा देताना दयामाया दाखवत नसत. या सर्वांमुळे हळूहळू गोपाळाच्या मनात पित्याबद्दल अढी निर्माण होत गेली.

गोपाळाला आता पाच वर्षे पूर्ण झाली; सहावे लागले. गोपाळचे उपनयन करण्याचे वय झाले. हे पाहून गोविंदशास्त्री विचार करू लागले. आता या गोपाळाचे उपनयन करायला पाहिजे. नंतर याला गुरुगृही पाठविले पाहिजे. आपल्या घरी ठेवले तर आपली माया कधी तरी उफाळून वर येईल. आणि गोपाळाचे अध्ययनाकडे लक्ष लागणार नाही. दुसऱ्या कोणाच्या तरी गुरुकुलात त्याला ठेवावे. लांबून आपण

त्याच्यावर लक्ष ठेवावे. काही झाले तरी आपला गोपाळ ह्या खंडातला सर्वश्रेष्ठ शास्त्री व्हायला हवा. गोविंदशास्त्र्यांची वाणी स्वच्छ, बोल स्पष्ट व खडे. तसेच गोपाळचे बोल असावेत अशी त्यांची सुप्त इच्छा होती; परंतु त्यांनी चुकूनसुद्धा ती बोलून दाखविली नाही. त्यांच्या साऱ्या आकांक्षा गोपाळवर केन्द्रित झाल्या होत्या.

उपनयनाची तयारी सुरू झाली. गोविंदशास्त्र्यांच्या मुलाचा व्रतबंध-समारंभ. आजूबाजूच्या गावांतून शास्त्री, पुराणिक आले. मोठ्या थाटाने हा समारंभ संपला. त्या वेळी इतर ब्राह्मणांनी बोलून दाखविले, " गोविंदशास्त्री, तुमचा मुलगा बापसे बेटा सवाई व्हायला पाहिजे हं ! " अशा प्रकारे गोपाळ गुरुगृही जाण्याचा प्रश्न निघाला. त्याचे उपनयन झाले असल्यामुळे आता अध्ययन सुरू करायचे. गोपाळची आई रमाकाकू यांना आपला मुलगा,–त्याचे बाबा एवढे मोठे गुरुकुल चालवीत असताना दुसऱ्या गुरुकुलात जावा हे मुळीच पसंत नव्हते.

त्या आपल्या पतीला म्हणाल्या, "आपण एवढे वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण. तुम्ही आपल्या हाताखाली घेऊन त्याला शिकवा व मोठा विद्वान करा. आपला एकुलता एक मुलगा,–त्याला दुसरीकडे पाठवू नका."

" हे पाहा, माझं का त्याच्यावर प्रेम नाही ? स्वतःचं घर असल्यामुळं काही वेळा आपलं प्रेम उफाळून येईल व त्याचे अध्ययन व्यवस्थित होणार नाही. त्याला कष्टाची, परिश्रमाची आवड निर्माण व्हायला पाहिजे. इथं चुकून कामचुकार होण्याची पण शक्यता आहे. तेव्हा आपण त्याला दुसऱ्या गुरुकुलात पाठवू. आपले रामशास्त्री आहेत त्यांच्याकडे पाठवू. ते मन लावून त्याच्याकडून अध्ययन करून घेतील. मी पण त्याच्यावर लक्ष ठेवणार आहे. त्याचं अध्ययन किती झालं, पाठांतर करतो की नाही हे मी पाहीन व वेळोवेळी रामशास्त्र्यांना सूचना देईन." एवढे ऐकल्यावर त्या माउलीचे समाधान झाले.

डबडबलेल्या नयनांनी गोपाळने आपल्या आईचा निरोप घेतला. तो गुरुगृही निघाला. त्याच्या मस्तकात विचारांचा डोंब उफाळला होता.



त्याला वाटे, आपले बाबा स्वतः वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण असता आपल्याला गुरुकुलात का बरे पाठवीत आहेत? आपण त्यांना नको झाल्यामुळे तर ते आपल्याशी असे वागत नसावेत ना? परंतु प्रत्यक्ष वडिलांना विचारण्याची त्याला हिम्मत नव्हती. पण त्यामुळे त्याचे त्याच्या वडिलांबद्दलचे मत अधिकच वाईट झाले. अशा उफाळलेल्या विचारांनी तो गुरुगृही येऊन पोहोचला.

## २

गोविंदशास्त्र्यांनी आपल्या मुलाला रामशास्त्र्यांच्या हाती सुपूर्द केले. गोविंदशास्त्री व रामशास्त्री हे बाळपणापासूनचे मित्र. गोविंदशास्त्री रामशास्त्र्याला म्हणाले, " राम ! आमच्या गोपाळला तुझ्याकडे ठेवलाय तो केवळ एका इच्छेने. तो मोठा पंडित व्हायला हवा. शास्त्री म्हणून त्याची कीर्ती पसरली पाहिजे. त्याच्याकडून अध्ययन करवून घे. तसा कष्टाळू मुलगा आहे तो. तो सारे करील. आमची सारी मदार आमच्या मुलावर आहे. स्वतःचा मुलगा आहे असे समजून त्याला वागव. अध्ययन करण्यात चुकारपणा करू लागला तर कडक शिक्षा कर. मुळीच दया दाखवू नकोस. काही होऊ दे, गोपाळ वेदशास्त्रसंपन्न असा ब्राह्मण झालाच पाहिजे. "

रामशास्त्र्यांना पण असाच एक परिश्रम करणारा चेला पाहिजे होता. त्यांनी ते आनंदाने मान्य केले. गोविंदशास्त्री घरी परतले.



इकडे गोपाळचे अध्ययन सुरू झाले. गोपाळला अध्ययनाची आवड. हुषारही तसाच. त्यामुळे गुरुकुलातील इतर मुलांपेक्षाही तो लवकरच प्रगती करू लागला. गोपाळ हुषार खरा; पण त्याला गर्वही तसाच. आपण हुषार आहोत, आपले अध्ययन चांगले. त्यामुळे त्याची इतर सहाध्यायांबरोबर प्रेमाची नाती नव्हती. इतरांपेक्षा आपण वेगळे आहोत हीच त्याची भावना. तो इतरांशी फटकून वागे. पण त्याचे अध्ययन चांगले असल्यामुळे त्याला फारसे बोलून घ्यावे लागत नसे. त्याने प्रत्यक्ष कोणाला दुखविले नाही अगर कोणाशी हेवेदावे केले नाहीत. पण तो कोणात मिसळला नाही. आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत ही भावना या त्याच्या वर्तनाच्या बुडाशी होती. त्यामुळे या गुरुकुलात एकत्र राहूनही त्याने जिवाभावाचे मित्र जोडले नाहीत.

गोपाळचे वडील गोविंदशास्त्री वरचेवर रामशास्त्र्यांकडे येत. गोपाळचे अध्ययन कुठपर्यंत आले आहे याची ते चौकशी करीत. त्याची प्रगती पाहून त्यांना समाधान वाटे. ते प्रत्यक्ष गोपाळला कधीच भेटत नसत. पण त्याच्या अध्ययनाकडे त्यांचे लक्ष होते. नेहमी रामशास्त्र्यांना आपल्या मुलाबद्दल ते सूचना देत.

आपले वडील आपल्या शिक्षणाबद्दल इतकी काळजी घेत असतात याचा पत्ता गोपाळला नसे. उलट या सर्व अध्ययनाच्या काळात आपल्या पित्याबद्दलची अढी वाढतच गेली. आपले वडील आपल्याकडे मुळीसुद्धा लक्ष देत नाहीत, आपण त्यांना जड झालो आहोत अशी त्याची भावना बनत गेली. अशा प्रकारे पिता-पुत्रांच्यामधील अंतर एक-सारखे वाढत गेले. असे असताही त्याने कधीही अध्ययनाकडे दुर्लक्ष केले नाही. गुरुकुलात नेहमी वादविवाद होत. वादविवादात गोपाळचा जय ठरलेला ! त्याचा आवाज पहाडी, विचार स्पष्ट, आणि आपले विचार मोठ्या विश्वासाने तो प्रतिपादन करी. तो इतरांना सहज निरुत्तर करी.

असे प्रश्न विचारी की प्रतिपक्षाला मोठा पेच पडे. अशा प्रकारे गोपाळ एक मोठा शास्त्री होण्याच्या मार्गाला लागला. आपले हे विजय आपल्या वडिलांनी पाहावेत, आपले कौतुक करावे असे त्याला वाटे. आपणही त्यांच्या कुशीत शिरून आपल्या महत्त्वाकांक्षा बोलून दाखवू, त्यांनी खूश होऊन आपल्या पाठीवरून हात फिरवावा, मग आपण मोठ्या उत्साहाने मोठमोठ्या विद्वानांना जिंकू; पण असे कधी झाले नाही. त्याच्या वडिलांना आपला मुलगा एक चांगला शास्त्री होण्याच्या मार्गाला लागला आहे हे ऐकून आनंद झाला. पण त्यांनी आपला आनंद कधी व्यक्त केला नाही. विद्वानांच्या सभेत आपला मुलगा चमकावा अशी त्यांची ईर्षा होती.

अशा प्रकारे गोपाळचे अध्ययन सुरू होते. त्यानेही मन लावून अध्ययन केले. एक चांगला शास्त्री रामशास्त्र्यांनी तयार केला. गोपाळलाही एक प्रकारचा जिव्हाळा या गुरुकुलाबद्दल निर्माण झाला होता. आपल्या यशाचे मानकरी रामशास्त्री आहेत, रामशास्त्र्यांमुळे आपले अध्ययन इतके चांगले होऊ शकले असे त्याला वाटे. शेवटी त्याचे अध्ययन संपले. त्याने आपल्या गुरूंना साष्टांग नमस्कार केला व त्यांचा आशीर्वाद घेतला. ते आशीर्वाद देताना म्हणाले, "गोपाळ, तू आता शास्त्री झालास. पण अध्ययन कधीही सोडू नकोस. नेहमी विचार कर. जितकी तपश्चर्या अधिक तितके फल अधिक, हे लक्षात घेऊन अध्ययन कर. जा–बाळ, यशस्वी हो; मोठा शास्त्री हो." जड अंतःकरणाने गुरुपिता व गुरुपत्नी यांचा निरोप घेऊन गोपाळ परतला.

फार वर्षांनी आपला लाडका लेक घरी आलेला पाहून रमाकाकूंचा आनंद गगनात मावेनासा झाला. त्यांनी त्याला दाराशीच उभा केला. मीठ-मिरची त्याच्यावरून ओवाळून टाकली, तांदूळ ओवाळून टाकले' आरती केली व त्याला घरात घेतले.

गोपाळ आता शास्त्री झाला. त्याच्या लग्नाच्या गोष्टी आता सुरू झाल्या. गोरज मुहूर्तावर वडगाव येथील नारायणशास्त्र्यांची मुलगी कमला हिच्याशी त्याचे लग्न झाले. कमला सालस व प्रेमळ होती. गोपाळलाही कमला आवडे. अशा प्रकारे त्यांचा संसार सुरू झाला.

▣ ▣

# ३

गोपाळची कीर्ती हळूहळू चंद्रकलांप्रमाणे वाढू लागली. गोपाळ आता गोपाळशास्त्री बनला. पहिलवान जसे कुस्त्यांचे फड जिंकतात त्याप्रमाणे हा शास्त्र्यांच्या सभा जिंकू लागला. वादविवाद चर्चेमध्ये गोपाळ-शास्त्र्यांचा जय ठरलेला. स्वतः गोपाळ आपल्या प्रगतीवर नितान्त खूष होता. त्याला वाटे, आपल्या वडिलांनी आपले चुकून तरी कौतुक करावे, जवळ घ्यावे, पाठीवरून हात फिरवावा. तसा गोपाळ मायेचा अतिशय भुकेला होता. गोविंदशास्त्री मात्र त्याला कधीही उत्तेजन देत नसत. त्यांना समाधान नसे. आपल्या मुलाने अधिक विजय मिळवावेत. भारतात त्याचा हात धरणारा विद्वान असता नये अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे चुकूनसुद्धा गोपाळसमोर ते त्याच्याबद्दल कौतुक अगर अभिनंदन करणारे बोल बोलत नसत. अशा प्रकारे दोघांमधील अंतर वाढत जाऊन दोघे दोन टोकांस गेले.

एकदा काय झाले, गावात एक विद्वान शास्त्री आला आहे अशी बातमी गोपाळच्या कानांवर आली. शास्त्री आव्हान देत फिरत आहे, एका घोड्यावर दोन्ही बाजूंस ग्रंथ ठेवून फिरत आहे. त्याला आजपर्यंत कोणीही जिंकू शकला नाही. असा विद्वान गृहस्थ आपल्या गावी आला आहे. गोपाळला पण या शास्त्र्याशी दोन हात करण्याची इच्छा निर्माण झाली. काही करून या शास्त्र्याला चीत करावे असा निश्चय करून गोपाळ उठला. हे शास्त्री ज्याच्याकडे उतरले होते तेथे आला. गावातील काही इतर शास्त्र्यांनीही या विद्वानाबरोबर चर्चा केली. पेच, प्रतिपेच टाकण्याचे प्रयत्न केले; पण स्थानिक शास्त्र्यांच्या पदरात अपयशाचे भरपूर माप पडले. याच वेळी गोपाळ येऊन पोहोचला. त्याचे वडीलही

इतर शास्त्र्यांबरोबर येऊन बसले होते. गोपाळची ओळख करून देण्यात आली. विवादाला सुरुवात झाली. गोपाळ आपल्या प्रतिपक्षाच्या तयारीचा अंदाज घेत होता. ते शास्त्री, या पोराला कोवळ्या काकडीप्रमाणे खाऊ या घमेंडीत होते. मोठ्या आत्मविश्वासाने गोपाळ मुद्दे मांडीत होता. आता विवाद रंगू लागला. त्या शास्त्र्यांचीही खात्री पटली की हे पोर काही लेचेपेचे नाही. तेही जपून पाऊल टाकू लागले. कुशल पहिलवान ज्याप्रमाणे अंदाज घेऊन प्रतिपक्षाला दमवून, एकदम अवघड पेच घालून लोळवितो त्याप्रमाणे गोपाळने प्रथमतः शास्त्र्यांचे पाणी ओळखले आणि तयारी ओळखली; ऐन रंगात विवाद आला असता चटकन एक अवघड समस्या, न समजण्यासारखी करून शास्त्र्यांसमोर टाकली. शास्त्र्यांनी ओळखले. अतिशय अवघड पेच टाकला. ते निरुत्तर झाले. त्यांनी आपला पराभव मान्य केला. गोपाळचा हा फार मोठा विजय होता. त्याचा आनंद गगनात मावेना. शास्त्र्यांची सभा त्याचे कौतुक करू लागली. आज तरी आपले वडील आपले कौतुक करतील अशी त्याला आशा वाटत होती.

गोपाळ घरी आला. त्याच्या आईने त्याच्यावरून मीठमिरची ओवाळून टाकली. त्या माउलीला अतिशय आनंद झाला होता. तिने कौतुकाचे उद्गार काढले. गोविंदशास्त्री तेथेच होते त्यांनी चटकन म्हटले, "फार मोठा विजय लावून आला आहे की नाही? एका फतरुड शास्त्र्याला जिंकलं म्हणून चढून जायला नको. याच्यापेक्षा वरचढ असे अनेक शास्त्री आहेत. त्यांना जिंक म्हणावं. पोकळ घमेंड नको!"

आपल्या वडिलांचे हे उद्गार ऐकून गोपाळ अतिशय खिन्न झाला. त्याचा सारा उत्साह मावळला. त्याला आपल्या वडिलांचा खूप राग आला. त्या रागाचे रूपान्तर सूडात झाले. आपली लायकीच आपल्या घरातल्या लोकांना समजत नाही. कधी कौतुक नाही, तर कधी प्रेमळ आशीर्वाद नाही. उत्साह अगर सहानुभूती काही घरातून मिळत नाही.

या विचाराने त्याचे मस्तक उठले. विचारांच्या प्रचंड वावटळी त्याच्या मनात उठल्या. सायंकाळी मनाला बरे वाटेल म्हणून बाहेर पडला. गावाबाहेर नदीकिनारी तो आला. नटलेला निसर्ग त्याचा राग दूर करूच शकला नाही. कशाला आपण जगायचे! त्यापेक्षा मेलेले बरे, असे विचार या वेळी गोपाळच्या मनात येत होते. तो शून्य नजरेने समोर पाहात होता. नदीच्या तीरावर त्याने एक दगड पाहिला. चटकन त्याच्या डोक्यात एक विचार आला,–आपण हा दगड आपल्या पित्याच्या डोक्यात घातला तर,– या विचाराने त्याचे अंग शहारले! त्याने विचार केला, काय हरकत आहे ?– माझे यश त्यांना पाहवत नाही, म्हणून हे असे वागतात. काही नाही, हा दगड त्यांच्या डोक्यात घालायचाच. रागाच्या भरात मनुष्य कोणताही अविचार करण्यास उद्युक्त होतो. क्रोध आपला अम्मल गोपाळवर चालवीत होता. अशा अवस्थेतच गोपाळ घरी आला. त्याने निश्चित ठरविले होते की, रात्रौ आईवडील झोपी जाताच आपण भला मोठा दगड वडिलांच्या डोक्यावर घालायचा.

रात्र झाली. सर्वजण जेवायला बसले. गोपाळ धड जेवला नाही. त्याच्या आईला हे जाणवले. तिला गोपाळ सकाळच्या प्रकरणामुळे रागावला आहे, म्हणून कमी जेवला असेल. आपण त्याचा राग शमवावा. त्याला जवळ घ्यावे, त्याची समजूत घालावी. पण गोविंदशास्त्र्यांसमोर असे बोलण्याची त्यांची छाती नव्हती. तिला उघड्या डोळ्यांनी सर्व सहन करावे लागे. गोपाळ धड जेवला नाही हे पाहून रमाबाईंना पण धड जेवण गेले नाही. दुःखाचे कढ आतल्या आत दाबून त्या पानावरून उठल्या. गोपाळही असाच अस्वस्थ झाला होता. अशा तऱ्हेने सर्वांची जेवणे झाली. गोपाळ झोपण्यासाठी माडीवर आला. गोपाळला झोप लागणे शक्यच नव्हते. त्याची आई आपले काम संपवून झोपायला आली.

खालच्या खोलीत त्याच्या आईवडिलांचे बोलणे सुरू झाले. त्याच्या-विषयीच बोलणे सुरू होते.

रमाबाई म्हणाल्या, "तुम्ही गोपाळला फार छळता. तो आता धड जेवला पण नाही. तुम्ही त्याचं कधी कौतुक करीत नाही की मायेनं पाठीवरून हात फिरवीत नाही. एवढा मोठा विजय त्यानं मिळवला पण उलट तुम्ही त्याच्या मनाला लागेल असं बोललात. तुम्ही दोघांत अंतर वाढवीत आहांत. मला हे पाहवत नाही. तोंड दाबून बुक्क्यांचा मार मला सहन करावा लागतो."

"तुला वाटतं मला त्याच्याबद्दल काही वाटत नाही. मला गोपाळचा अभिमान वाटतो. तो मोठा व्हावा, गोपाळ अजिंक्य शास्त्री व्हावा असं मला वाटतं. आज मी त्याचं कौतुक केलं तर तो शेफारून जाईल; त्याची प्रगती होणार नाही. त्यानं सारखं मोठं व्हावं म्हणून माझा प्रयत्न आहे. त्याच्या प्रत्येक हालचालीवर माझं लक्ष आहे. रागावला आहे ना? रागावू दे. आज ना उद्या त्याला माझं मन समजेल, व त्याचा राग दूर होईल. माझ्या साऱ्या आकांक्षा त्याच्यावर केन्द्रित झाल्या आहेत. मी अशा एका सोनेरी दिवसाची वाट पाहात आहे की ज्या दिवशी 'गोपाळ-शास्त्री' हे नाव अखंड भारतात गाजेल!"

आपल्या वडिलांचे हे बोल ऐकून गोपाळ अक्षरशः बर्फासारखा विरघळला. त्याचा क्रोध कोठल्या कोठे पळाला. आपल्या पित्याचं मन आपल्याला समजलं नाही म्हणून तो दुःखी-कष्टी झाला. आपण काय करायला निघालो होतो? हा विचार मनात येऊन तो शोकमग्न झाला. भारावलेल्या अंतःकरणाने तो खाली आला व त्याने आपल्या पित्याचे पाय धरले. तो म्हणाला, "बाबा, मला क्षमा करा! मी आज तुमच्या जिवावर उठलो होतो." त्याने आपल्या पित्याचे पाय अश्रूंनी भिजवून टाकले.

गोविंदशास्त्र्यांनी त्याला वर उचलला. ते म्हणाले, "गोपाळ, असा रडतोस का? काय झालं ते तरी सांग."

गोपाळने आपले अंतःकरण आपल्या पित्यापुढे उघडे केले. त्याने सारी हकीगत निवेदिली. शेवटी तो म्हणाला, "बाबा, मी महान पापी आहे. मला क्षमा नाही. तुम्हांला मी मारायला टपलो होतो. मी तुमचा जीव घेणार होतो. पितृहत्येबद्दल मला शिक्षा सांगा. माझं कृत्य अतिशय घृणास्पद आहे. बाबा, माझा मलाच तिटकारा वाटतो."

"गोपाळ, झालं गेलं गंगेला मिळालं. आता का दुःख करतोस? तू मला कुठं मारलंस? मी तर जिवंत आहे; होय ना?"

"नाही बाबा, मारायचा विचार करणं आणि मारणं यात माझ्या दृष्टीनं काही फरक नाही. तुमचं बोलणं मी ऐकलं नसतं तर तुमचा मी जीव घेतला असता. तेव्हा गुन्हा झाला आहे; मला शिक्षा द्या. देहान्त प्रायश्चित्त पण भोगायला मी तयार आहे." अश्रूंचा प्रवाह गोपाळच्या डोळ्यांतून वाहात होता. त्याला पश्चात्ताप झाला होता. प्रायश्चित्त घेण्याचा त्याचा निश्चय ठरला.

गोपाळचे हे बोल ऐकून गोविंदशास्त्र्यांसारखा कडवा मनुष्य मऊ झाला. त्यांचे हृदय भरून आले. ते म्हणाले, "नको, गोपाळ,–नको. तू देहान्त प्रायश्चित घेऊ नकोस. तू जर आम्हांला सोडून गेलास तर आम्ही कोणासाठी जगावं?"

"तर बाबा, दुसरी कोणतीही शिक्षा या पापासाठी असेल तर सांगा; मी ती घेण्यास तयार आहे. मी शिक्षा घेण्यास तयार आहे. मी शिक्षा घेणारच. बाबा, माझ्या पापाचं परिमार्जन मला करू द्या."

ह्या त्याचा निश्चय पाहून गोविंदशास्त्री म्हणाले, "तुझा निश्चयच असेल तर मी सांगतो. शिक्षा भयंकर आहे. "१४ वर्षं सासरी जाऊन राहणं." हीच शिक्षा शास्त्रात सांगितली आहे. देहान्त प्रायश्चित्त बरं, पण सासऱ्याच्या घरी जाऊन राहणं नको असं तुला वाटेल."

"बाबा, ही शिक्षा भोगण्यास मी तयार आहे. मी उद्याच निघेन म्हणतो." गोपाळने आपला निश्चय जाहीर केला.

दुसऱ्याच दिवशी सकाळी गोपाळ आपल्या प्रेमळ माता-पित्यांचा आशीर्वाद घेऊन सासरी निघाला. बरोबर त्याची पत्नी होती.

अशा प्रकारे गोपाळच्या नव्या जीवनाला सुरवात झाली.

▣ ▣

४

गोपाळ आता आपल्या पत्नीसह सासरी येऊन पोहोचला. मुलगी व जावई पाहून सासऱ्याला आनंद झाला. जावई अचानक आलेले पाहून नारायणशास्त्री साशंक झाले. परंतु जावई पडला. विचारायचे कसे? हा प्रश्न त्यांच्यासमोर पडला. पहिले चार दिवस जावयाचे कोडकौतुक झाले; पण जावई हालायचे चिन्ह दिसेना. तेव्हा हळूहळू जावयाकडे सर्वांचे दुर्लक्ष होऊ लागले. घरी बसून खाणे गोपाळलाही आवडत नसे. तो आता गुरांना रानात नेई. आपण एक शास्त्री, पण एका सामान्य गुराख्यासारखे गुरे राखतो—हे विचार येऊन तो खिन्न होई.

अशी त्याला १४ वर्षे काढायची होती. अपमान सहन करावा लागणार होता. आपल्या सासऱ्याकडून बोलून घ्यावे लागणार होते. गड्याचे काम करावे लागणार होते. आजपर्यंत गोपाळ घमेंडीत होता. त्याची घमेंड पुरी जिरली. आतापर्यंत तो पुस्तकी विद्या शिकला होता. आज त्याला नवशिक्षण मिळत होते. खडतर आयुष्याच्या भट्टीत तो घातला गेला. या भट्टीतून तो तापून बाहेर येणार होता. त्याच्या जीवनाला आता आकार येऊ लागला. अहंकार, गर्व, खोटा अभिमान नाहीसा झाला. सासऱ्याच्या घरी १४ वर्षे राहण्याची भयंकर शिक्षा कशी असते याची त्याला आता जाणीव झाली होती. या सर्व दिव्यातून नवा गोपाळ जन्माला येत होता. गोपाळची वाढ आजपर्यंत एकांगी झाली होती. आता दुसरी बाजू पण वाढू लागली. मातापित्यांच्या प्रेमळ छत्राखाली असताना त्याला हे दुःख जाणवले नव्हते. आता क्षणोक्षणी जाणवत होते. असा हा प्रत्येक क्षण त्याच्या जीवनाचे शिल्प घडवत होता.

गोपाळ आता गडी झाला होता. घरचे पाणी भरी, गुरांना पाही, शेतावर जाई, प्रसंगी रानात जाई. अशा प्रकारचे जीवन तो जगू लागला.

गोपाळ आता अंतर्मुख झाला होता. तो नेहमी विचार करी. विचाराचे आगळे तेज त्याच्या चेहऱ्यावर चमकू लागले. जीवनातील आततायी-पणा कमी झाला. तो विचारी, विवेकी बनला. जीवनाची दुसरी बाजू त्याला उमजली होती. तो कष्टाला मुळीच घाबरत नसे. बारा रेड्यांचे बळ त्याच्या अंगी होते. मोठ्या धैर्याने तो जीवन जगत होता.

कमला आर्यपत्नी होती. तिला पतीचे हाल पाहवत नसत. त्याची पात्रता ती ओळखत होती. एखाद्या गड्यासारखे गोपाळला राबावे लागत आहे हे पाहून तिचे आतडे तिळतिळ तुटत असे. ती शास्त्र्याची पत्नी होती. तिने पण आपल्या या संसाराला हातभार लावण्याचा निश्चय केला. ती सवाष्ण म्हणून इतरांच्याकडे जेवायला जाई.

## ५

त्याच गावात एक व्यापारी राहात असे. तो व्यापारी साहसी होता. तो नेहमी उंट, घोडे यांवर सामान लादून आजूबाजूच्या गावी बाजारासाठी जाई. काही वेळा परप्रान्ती जाई. एकदा त्याने साहस करण्याचे ठरविले. उत्तर हिंदुस्थानात व्यापार करावा असा त्याने निश्चय केला. त्याने आपल्या पत्नीला हे सांगितले. तिने बराच मोडता घालण्याचा प्रयत्न केला. पण त्या व्यापाऱ्याने आपल्या स्त्रीचे मुळीच ऐकले नाही. तो व्यापारासाठी बाहेर पडला. त्याच्या स्त्रीला नुकतेच दिवस गेले होते. आपल्या पतीला ही आनंदाची बातमी सांगावी असे तिला वाटे. पण ओठांतून लाजेने शब्द बाहेर पडत नसत. अनेक वेळा तिने सांगण्याचा प्रयत्न केला, पण प्रत्येक वेळी लाजेने तिला दगा दिला.

ती एकटी घरी राहात होती. नोकरचाकर दिमतीला होते. पण तिला कशातच गोडी वाटत नसे. तिला दिवस भरले होते. ती प्रसूत झाली. मुलगा झाला. तेवढेच सुख तिच्या वाटणीला. पैसाअडका खूप असूनही ती दुःखी होती. तिचे दुःख न सांगण्यासारखे होते. पती व्यापाराला जाऊन दोन वर्षे झाली होती. तो अजूनही परत आला नव्हता. चिंताज्वाला तिच्या मनाला जाळीत होत्या. पती लवकर यावा म्हणून तिने सत्यनारायण केला. नारायणशास्त्र्यांना तिने बोलाविले होते. नारायणशास्त्री आले. त्यांच्याबरोबर कथा ऐकायला कमला पण आली होती. त्यातून या दोन स्त्रियांची ओळख झाली. दोघीही दुःखी. त्यामुळे त्यांची मैत्री वाढू लागली. व्यापारी स्त्रीला कमलेबद्दल आदर वाटे. अशी वर्षांमागून वर्षे गेली. गोपाळची मुदत संपत आली.

एक दिवस या मैत्रिणी बोलत असताना व्यापारी स्त्री म्हणाली, "कमला, तू शास्त्र्याची पत्नी. माझे पती व्यापाराला जाऊन १४ वर्षं झाली, पण अजून परतले नाहीत. माझ्या मनात अनेक शंका-कुशंका येतात. 'मन चिंती ते वैरी न चिंती' अशी माझी गत झाली आहे. अशा वेळी तू मला मदत कर. असं एखादं वचन लिहून दे,-जे मला पुण्यप्रद होईल. माझ्या संकटातून माझं संरक्षण कर."

कमलेने हे मान्य केले. सायंकाळी गोपाळ रानातून श्रमून भागून परत आला. त्याने पाय धुतले. तो अध्ययनासाठी बसला. त्याने अध्ययन मुळीच सोडले नव्हते. त्याचा व्यासंग अव्याहत चालू होता. १४ वर्षे पूर्ण झाल्याशिवाय वादविवादात भाग घ्यायचा नाही, हे त्याने मनाशी ठरविले. अध्ययनासाठी बसला इतक्यात कमला तेथे आली. ती त्याला म्हणाली, " नाथ, माझं एक काम कराल काय ? "

मोठ्या प्रेमळपणाने त्याने तिला काय हवे याची विचारपूस केली. त्या व्यापारी स्त्रीची मागणी तिने गोपाळला सांगितली. गोपाळ विचारात पडला. आपल्या पत्नीचे मन त्याला मोडवेना.

तरी तो म्हणाला, " कमला, मी आज कुठं शास्त्री आहे ? मी केवळ आता गुराखी बनलो आहे." त्याचे हे उद्गार ऐकून तिला गहिवरून आले. गोपाळ कमलेला दुखवत नसे. त्याचे तिजवर मनस्वी प्रेम होते. कमलचा त्याच्यावर पुरा विश्वास होता. त्याची पात्रता ती ओळखत होती. ती हिरमुसली आहे हे पाहून गोपाळला खेद वाटला. त्याने वचन लिहून देण्याचे मान्य केले.

त्याने एक कर्दळीचे पान आणले, व पुढील वचन त्यावर लिहिले : " कोणतेही कृत्य करण्याअगोदर पुन्हा एकदा विचार करा." हे पान कमलेने त्या स्त्रीला नेऊन दिले. त्या स्त्रीने ते पान आपल्या मंचकावर

टांगले. त्या स्त्रीचा मुलगा आता मोठा झाला. तो १२ वर्षांचा होता; परंतु १७–१८ वर्षांचा वाटे. मोठ्या उफाड्याच्या अंगाचा होता तो.




शाला.
विभाग
दिनांक
क्र.

एके दिवशी त्या मुलाला बरे वाटत नव्हते. ताप आला होता. त्या माउलीचा जीव घाबरा झाला. एकुलता एक मुलगा. त्याला ती तळ-

हातावरच्या फोडाप्रमाणे वागवी. त्या रात्री ती मुलाला मांडीवर घेऊन थोपटू लागली.

याच वेळी व्यापारी १४ वर्षानंतर परत आला. गावाच्या वेशीत येताच त्याच्या मनात कलीने प्रवेश केला ! त्याच्या मनात एक अभद्र विचार आला. चवदा वर्षे झाली, आपली पत्नी आपल्याशी एकनिष्ठ तरी आहे का? या प्रश्नाने त्याचे मन घेरले. तो मुद्दाम वेशीबाहेरच राहिला.

रात्र पडली. मध्यरात्र झाली. तो गावात आला. घराजवळ आला. घरात त्याला दिवा दिसला. त्याच्या मनात अभद्र विचारांचे काहूर माजले. तो मागील दारी आला. तेथे एक झाड होते. त्या झाडाच्या साहाय्याने तो छपरावर उतरला. दिवा खोलीत जळत असलेल दिसला. त्याने काही कौले बाजूला केली. आत पाहतो तो मंचकावर एका तरुणा-बरोबर आपली पत्नी बसली आहे. त्याच्या मनावर क्रोधाने अंमल गाज-विण्यास सुरुवात केली. त्याने खोलीत उडी मारली.

"कुलटे, हे धंदे करतेस काय?" म्हणून तो तलवार उपसून आपल्या पत्नीवर धावून गेला. घाव घालणार इतक्यात त्याचे लक्ष मंचकावर टांगलेल्या कर्दळीच्या पानाकडे गेले. त्यावरील वचन त्याने वाचले. त्याच्या कुविचाराला हा एक मोठा धक्का होता ! त्याने स्वतःला सावरले पण पूर्ण राग गेला नव्हता. त्याने विचारले, "हा कोण?"

तिने उत्तर दिले; "तुमचा मुलगा. आजारी आहे. तुम्ही व्यापाराला जाताना मला दिवस गेले होते, पण लाजेनं मी सांगितलं नाही. विचार करा, तुम्ही जाऊन किती वर्षे झाली? हा मुलगा १३॥ वर्षांचा आहे. तो तुमचाच आहे. अंगानं धिप्पाड आहे."

त्या वेळी तो मुलगा कण्हू लागला, "आई, आई—"

आता हा व्यापारी पुरा विरघळला. त्याने वस्तुस्थिती ओळखली. आपण केवढा अविवेक करणार होतो !– त्याची त्याला जाणीव झाली. तो शरमला. आपला पुत्र पाहून तो अतिशय आनंदला. पुत्रालाही आनंद झाला. हळूहळू त्याचा ताप उतरला. या वचनाने आपणास वाचविले– हे त्या स्त्रीने ओळखले. मनातल्या मनात तिने कमलाला, गोपाळला धन्यवाद दिले. तिने कमलाची सारी हकिगत आपल्या नवऱ्याला सांगितली. व्यापारी पण उमजला की, या कर्दळीच्या पानाने आपला संसार सावरला; नाही तर आपण अविवेकाच्या भरात वाटेल ते अपकृत्य केले असते !



दुसऱ्या दिवशी सकाळी तो व्यापारी नारायणशास्त्र्याकडे गेला. गोपाळचीही १४ वर्षे पूर्ण झाली. त्या व्यापाऱ्याने जाऊन गोपाळचे पाय

भरले. गोपाळ आश्चर्यचकित झाला. त्याला काहीच समजेना. तेव्हा व्यापाऱ्याने आपली सारी कथा सांगितली. त्याने गोपाळला आपल्याकडे सत्यनारायणाच्या कथेस येण्यास सांगितले. सासऱ्याला पण जावयाचा अभिमान वाटू लागला.


संध्याकाळी सारी मंडळी कथेस जमली. व्यापाऱ्याने साऱ्या गावास आमंत्रण दिले होते. सारा गाव पूजेला लोटला होता.

पूजा संपली. त्या व्यापाऱ्याने गोपाळचा जाहीर सत्कार केला. मानाची शाल त्याला अर्पण केली. त्याच्या स्त्रीने कमलेची ओटी भरली. व्यापाऱ्याने गोपाळचा धन, कपडालत्ता देऊन गौरव केला !

गोपाळ चौदा वर्षांची शिक्षा भोगून आपल्या घरी आला. आई-वडिलांना पाहून त्याला भडभडून आले. त्याने ती शाल आपल्या मातापित्यांच्या पायांवर ठेवली. आनंदाश्रू सर्वांच्या डोळ्यांतून वाहू लागले.

नवजीवन जगण्यासाठी गोपाळ परत आला होता. १४ वर्षांपूर्वीचा गोपाळ व आताचा गोपाळ यांत जमीन-अस्मानाचा फरक पडला. एक नवीनच तेज त्याच्या मुखावर विलसत होते.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. ३९९ दिनांक ......
... क्र. ......
BVBK-0400399




म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा
दा. क्र. ३९९
L... ...-C ...399

# गोपाळशास्त्री

वासू देशपांडे

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. ३ee दिनांक ......
विषय बा. वा.

BVBK-0 00399

मूल्य एक रुपया